महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,जिल्हा कार्यालय ठाणे.
लक्ष्मी विष्णू सदन, महर्षि कर्वे रोड, नौपाडा, ठाणे-४००६०१
दुरध्वनी क्रमांक ०२२-२५३६६०७५ ईमेल dviothane@rediffmail.com

जा क्र./ठाणे/जाहिर सूचना/२०२४/३१५ दि. १९/०९/२०२४

# -: जाहिर सूचना :-

सर्व जनतेस कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत दि. १ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत मंडळाच्या विविध योजनेमार्फत युनिट उभारणी करुन ग्रामोद्योग कारागिरांनी तयार केलेल्या उत्पादनांचे प्रदर्शन गांवदेवी मैदान, ठाणे येथे भरविण्यात येणार आहे. सदर ठिकाणी ३० स्टॉल लावण्यात येणार आहे त्यासाठी स्टॉल उभारणी व इतर खाली दर्शविलेल्या कामासाठी जाहिर रित्या निविदा (दरपत्रक) मागविण्यात येत आहे. दरपत्रक स्विकारण्याची अंतिम तारिख २७/०९/२०२४ रोजी (कार्यालयीन वेळेत) सकाळी १०.०० ते संध्याकाळी ०६.०० वाजेपर्यंत राहील. त्यानंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

- प्रदर्शनासाठी मागविण्यात येणारे दरपत्रक खालीलप्रमाणे –

| अ.क्र | बाब |
|---|---|
| १ | स्टॉल उभारणी खर्च<br>२ खूर्ची, टेबल, विदयुत फॅन सह. ३० स्टॉल (७ X ७) २ कमान, १ स्टेज, ४ सोफा, कार्यक्रमाकरिता ५० खूर्ची |
| २ | संरक्षक डोम, पूर्ण प्रदर्शन कव्हर, चटई (मॅट), प्लॅट फॉर्म (६० X १०० चौ.फुट) विथ डेकोरेशन |
| ३ | प्रचार प्रसिध्दी वृत्तपत्र जाहिरात, प्रिंट छपाई फलेक्स, FM ब्रॉडकॉस्टींग/ सोशल मिडिया जाहिरात |
| ४ | सुरक्षा रक्षक व सिसीटिव्ही / अग्नीशमन साहित्य / स्वच्छता सेवा ७ दिवस |
| ५ | विमा |
| ६ | शुभारंभ कार्यक्रम<br>मंडप, खुर्ची, साउंड सिस्टीम, विदयुत जोडणी, उद्घाटन कार्यक्रम, समई व इतर साहित्य, फोटोग्राफी व्हिडिओ शुटींग. |
| ७ | विदयुत |
| ८ | प्रदर्शन स्मरणिका / सहभाग प्रमाणपत्र. |

- **दरपत्रकासाठी अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील.**

१) मंडळाच्या यापूर्वी झालेल्या प्रदर्शनाच्या आधारावरच दरपत्रकांची किंमत अंतिम मानली जाईल.
२) स्मरणिके मध्ये १६० पेजेस, ब्लॅक ॲडव्हाईट असतील. त्यात फोर कलर्स कव्हर पेज लॅमिनेशन व आतील ८ पृष्ठ कलर पेज असतील.
३) स्मरणिकेची साईज २४// इंच लांबी व १८ इंच रुंदी अशी असेल.
४) दरपत्रक धारकासमवेत तडजोडही होवु शकते. यासाठी समिती सदस्य व दरपत्रकदार यांना बोलावुन जो अधिक सवलती देईल त्यांस प्राधान्य देण्यात येईल.
५) समितीच्या सदस्याद्वारे वेळोवेळी घेतलेले नियम दरपत्रकधारकास प्रदर्शनासाठीचे गेट व अनुषंगिक किरकोळ बाबी यामध्ये बदल होवू शकतो. त्यांचा खर्च आगावून समितीद्वारे मंजुर करुन अधिक सुविधा आकार या शिर्षकाखाली संबंधितांना अदा करता येईल.
६) दरपत्रक स्वीकारणे नाकारणे याचे सर्व हक्क समितीने राखून ठेवण्यात येत आहेत.
७) दरपत्रकप्रमाणे कामकाज न झाल्यास संबंधितावर योग्य ती कार्यवाही समितीच्या नियमानुसार करण्याचे अधिकार समितीकडे राखून ठेवण्यात आले आहेत.
८) दरपत्रक हे मा. अध्यक्ष / सचिव, प्रदर्शन समिती, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, ठाणे या नावाने सादर करावे.

र.श्री.सुरुंग
जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, ठाणे.
तथा सदस्य सचिव
राज्यस्तरीय महाखादी प्रदर्शन समिती

प्रत नोटिस बोर्डवर / मंडळाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येत आहे.
प्रत माहीतीस्तव –
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई.